**लोकसत्ता चळवळ**

# " प्रांतवाद सोडा – भारत जोडा यात्रा "

लोकसत्ता चळवळीची **'एक भारत एक जनता मोहिम'**

**का?**

इंग्रजांनी **फोडा आणि राज्य करा** ही नीति वापरुन भारतावर राज्य केले हे तर प्रसिद्धच आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर साठ वर्षांनंतरही दुदैवाने इंग्रजांच्या जागी काही भारतीय तीच **फोडा आणि राज्य करा** ही नीति वापरुन आपल्या भावनांशी खेळून **आपल्याला फसवत आहेत, लुबाडत आहेत व आपल्यावर राज्य करीत आहेत.**

एक समृध्द राज्य व दुसरे गरीब राज्य हयांच्यातील विषयता वाढत चालली आहे. भारतात राजकीय पक्ष प्रादेशिकवाद, धर्मवाद, जातीयवाद व सीमावाद अशा विविध वादांना खतपाणी घालतात. हल्लीच घडलेल्या घटनांवरुन दिसून येते की मूठभर गुंडप्रवृत्तीची मंडळी देशाच्या कुठल्याही भागातील जनजीवन विस्कळीत करु शकतात. उदाहरणार्थ, विविध राज्यातून आलेले गरीब मजूरांवर आसाम, महाराष्ट्र व देशातील इतर भागात झालेले हल्ले देशाच्या एकात्मतेवर आघात करणारे ठरत आहेत. प्रांतवाद जोपासणा–या पक्षांनी साधारणपणे कधीच कायद्याच्या राज्याचा मान राखलेला नाही तसेच त्यांनी राज्यकारभार सुधारण्याकडे लक्ष दिले नाही.

**प्रांतवाद सोडा–भारत जोडा यात्रा** अशा प्रकारच्या राजकीय अपप्रवृत्तींना शह देऊन राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेने गरीबी व बेरोजगारीच्या प्रश्नांचा सामना करण्यासाठी विधायक उपाय शोधण्याच्या गरजेकडे लक्ष वेधण्याचा एक प्रयत्न आहे.

**उद्दिष्टये**

1 ' फोडा आणि राज्य करा ' हया राजकीय नीतिला नकार.
2 बेरोजगारीचे एक प्रमुख कारण रोजगार प्रविणतेची समस्या आहे हया वस्तुस्थितीकडे लक्ष वेधणे.
3. बाबा आमटेंच्या स्मृतिला अभिवादन करणे.

**कोण?** 18 ते 30 वर्षे वयोगटातील तरुण, समर्पित, देशप्रेमी भारतीय नागरिक

**कुठे ?** हया चळवळीद्वारे राष्ट्रविघातक प्रवृत्तींविरुध्द जनजागृती करण्यासाठी देशातील विविध राज्यांत यात्रा काढण्यात येतील. सुरुवातीला महाराष्ट्रातून दिल्ली, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश व बिहार अशा चार राज्यांत यात्रा काढण्यात येतील.

**कधी ?** पहिली भारत जोडा यात्रा जुलाई 2008 मधे सुरु होणार ।

**तुम्ही कसे सहभागी व्हाल ?**

**संपर्क** करा **राजकुमार जनगम** **91 9867987031** **जुई गांगण** **91 9892837534**
किंवा **ई–मेल** करा **volunteer.loksatta @gmail.com**

## लोकसत्ता चळवळीबद्दल :

लोकसत्ता चळवळ राजकारण व शासनव्यवस्था हया क्षेत्रात व्यापक सुधारणांसाठी लक्षणीय यश मिळविलेली भारतातील प्रमुख सामाजिक संस्था व नागरिकांची चळवळ आहे . वोट इंडिया (**www.voteindia.org**) ,वोट मुंबई (**www.votemumbai.org**) व वोट पोलिस (**www.votepolice.org**) मोहिमांद्वारे विविध संस्थांच्या सहकार्याने लोकसत्ता चळवळ राजकीय व शासनव्यवस्थेतील सुधारणांसाठी काम करत आहे.

वेबसाईट – **www.loksattamovement.org**

लोकसत्ता चळवळ, महाराष्ट्र विभाग कार्यालय – बेस युनीट 4, भायखळा सर्विस इंडस्ट्रीज प्रीमायसेस,
दादोजी कोंडदेव मार्ग, भायखळा (पूर्व), मुंबई–400 027
दुरध्वनी – 23772242 / 23772284